## सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## कंत्राटी तत्वावर भरती मुदतवाढ जाहिरात क्र.३

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेमध्ये प्रधानमंत्री आवास योजना अंमलबजावणी करणेसाठी महाराष्ट्र शासन गृहनिर्माण क्रमांक प्रआओ.२०१५/प्र.क्र.११०/ गृनिधो-२ (सेल) दिनांक ९ डिसेंबर २०१५ च्या आदेशानुसार शहरस्तरीय तांत्रिक कक्षाकडे खालील नमुद करणेत आलेली पदे ११ महिन्या करिता कंत्राटी तत्वावर भरण्याची असुन अर्बन प्लॅनर / टाऊन प्लॅनिंग स्पेशालिस्ट या पदासाठी यापुर्वी जाहिरात देण्यात आलेली होती. परंतु अर्बन प्लॅनर / टाऊन प्लॅनिंग स्पेशालिस्ट या पदासाठी प्राप्त झालेले सर्व अर्ज अपात्र ठरल्याने फेर जाहिरात काढण्यात येत आहे. तरी पात्र व इच्छुक उमेदवारांकडुन दिनांक 06 / 12 /२०२२ रोजी अखेर कार्यालयीन वेळेपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

(टिप - सदर पदासाठी यापुर्वी अर्ज केलेल्या उमेदवारांनी मुदतवाढ जाहिरातीनुसार ते पात्रता धारण करीत असल्यास पुन्हःश्च अर्ज करावेत.)

| अ.क्र. | पदाचे नाव | तपशिल |
|---|---|---|
| १. | अर्बन प्लॅनर / टाऊन प्लॅनिंग स्पेशालिस्ट | पदसंख्या ०१ (कंत्राटी ) |
| | शैक्षणिक अर्हता आणि अनुभव | 1] Master's degree in Urban Planning or Regional planning or Architecture Management with at least 1-3 years experience in a managerial position.<br>2] Having experience in project management with 1 to 3 years in a managerial position.<br>3] Experience in working with large scale urban development / affordable housing/ slum development projects / programmes.<br>4] Experience in implementing urban reforms for states and ULBs..<br>5] सदरचा अनुभव हा शैक्षणिक कालावधी पुर्ण झाल्यानंतरचा असावा.<br>6] सर्वसाधारण उमेदवारांकरिता कमाल वयोमर्यादा ३८ वर्षापर्यंत.<br>7] ओबीसी / एसी / एसटी उमेदवारांकरिता कमाल वयोमर्यादा ४३ वर्षापर्यंत. |
| | परिश्रमिक मोबदला | Rs. 60,000/- per month. |

**उमेदवारांना सर्वसाधारण सुचना व अटी -**

१. उमेदवाराने अर्जासोबत स्वत:चे अलिकडच्या काळातील फोटोसह शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र अनुभव, आधार कार्ड ओळखपत्र, जन्म तारखेचा दाखला, इत्यादी कागदपत्राच्या साक्षांकित प्रतीसह अर्ज मा. आयुक्त. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचे नांवे फक्त मुख्य बारनिशी मनपा मुख्यालय इमारत सांगली. येथे सादर करण्याचा आहे. टपालाने अथवा अन्य पध्दतीने मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

२. उपरोक्त पदावर नियुक्तीचा कालावधी हा शासन अनुदानावर अवलंबुन राहील.

३. या पदासाठी जाहिरातीमध्ये दर्शविलेली अर्हता अर्ज करतेवेळी उमेदवारांनी धारण केलेली असणे आवश्यक आहे.

४. प्राप्त अर्जाची छाननी अंती लेखीपरिक्षेची / मुलाखतीची तारीख पात्र उमेदवारांना कळविणेत येईल. उमेदवारांनी अर्जामध्ये त्यांचा सदयाचा राहण्याचा पत्ता व मोबाईल नंबर व ईमेल आयडी न चुकता नमुद करावा.

५. सदर कंत्राटी तत्वावरील नियुक्ती हि निव्वळ तात्पुरत्या स्वरूपातील असुन या नियुक्तीचा महानगरपालिका आस्थापनेवरील सेवेशी कोणताही संबंध नाही. नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास महानगरपालिकेच्या सेवेत कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही. अथवा कायदेशिर दाद मागता येणार नाही.

६. परिक्षा /मुलाखती /नेमणुकीसाठी शिफारस यापैकी कोणत्याही टप्प्यावर टपाल खात्याकडुन उमेदवारास वेळेवर पत्र न मिळाल्यास त्यास सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

७. निवड होणा-या उमेदवारांना महानगरपालिकेच्या शर्ती अटी नुसार विहित नमुन्यात रुपये.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर बंधपत्र करुन देणे बंधनकारक राहील.

८. सदर जाहिरातीच्या नियुक्त्या,पदसंख्या, शर्ती अटी यामध्ये बदल कमी अधिक मजकुर इ.बदल वा प्रक्रीया रद्द करणेचे अधिकार मा.आयुक्त महानगरपालिका यांच्याकडे राखुन ठेवण्यात आला आहे.

मा.आयुक्तसो यांचे मान्यतेनुसार }

(राहुल रोकडे)
**उपायुक्त, (मुख्यालय)**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका.

क्र.मनपा /आस्थावि / ०१/१८८३/२०२२-२३
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक २८ / ११ /२०२२